झालेल्या कर्मचाऱ्यांच्या / अधिकाऱ्यांच्या, वेतनवाढ अनुज्ञेयतेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः आप्रयो- १०१६ /प्र.क्र. ६७/ २०१६/सेवा- ३**
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ०८ सप्टेंबर, २०१६.

वाचा

शासन निर्णय क्रमांक: वित्त विभाग, क्र.वेतन १३१३/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक २३ मे, २०१४.

**प्रस्तावना -**

ज्या शासकिय अधिकारी/ कर्मचारी यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील ८ वा अथवा १० खाली विभागीय चौकशी सुरू आहे अथवा त्या अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द न्यायालयात, भारतीय दंड विधान वा लाचलुचपत प्रतिबंधक कायदया अंतर्गत वा अन्य कायदयातील तरतुदी अंतर्गत दावा न्यायप्रविष्ठ आहे, अशा शासकीय कर्मचा-यास त्याच्या विरुध्दचे सदर प्रकरण अंतिमत: निकाली निघण्यापुर्वीच, सदर प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून त्यास विहित कार्यपध्दती अनुसरून शासन सेवेत पुनर्स्थापना करण्यात येते. त्यावेळी त्याचे पुनर्स्थापनेच्या पदावरचे वेतन हे, त्याच्या निलंबनाच्या अगोदरच्या तारखेस तो जेवढे वेतन घेत होता तेवढेच वेतन निश्चित होईल अशी तरतूद उपरोक्त शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक २३ मे २०१४ मध्ये करण्यात आली आहे. तथापि अशा प्रकारे शासन सेवेत पुनर्स्थापित झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास त्याचा निलंबन कालावधी नियमित होण्यापूर्वी वेतनवाढ अनुज्ञेय ठरते किंवा कसे? या बाबतची तरतूद, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मध्ये केलेली नाही. तसेच सदर बाबत स्पष्ट तरतूद करणारा शासन निर्णय देखील हयापूर्वीच निर्गमित झालेला नाही. सदर शासन निर्णय निर्गमित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता, त्या बाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय -**

ज्या कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची किंवा न्यायालयीन कारवाई अंतिमरित्या पुर्ण होण्यापूर्वीच, निलंबनाची कारवाई मागे घेण्यात येऊन वा रद्द करण्यात येऊन त्यास शासन सेवेत पुनर्स्थापित करण्यात आल्यास, अशा पुनर्स्थापित शासकिय कर्मचाऱ्यास, शासन अधिसूचना वित्त विभाग दि. २२.०४.२००९ मधील नियम क्र.१० मधील तरतूदीनुसार पुनर्स्थापनेनंतर येणाऱ्या दि. १ जुलै या तारखेपूर्वी ६ महिने अथवा अधिक एवढी सलग सेवा झाल्यानंतर त्याच्या निलंबनाच्या लगतच्या दिवशी तो जेवढे वेतन घेत होता, तेवढयाच वेतनावर आधारित तथापि सदर अधिसूचनेतील नियम क्र.९ मध्ये विहित केलेल्या दराने, वार्षिक वेतनवाढ क्रमप्राप्त म्हणून अनुज्ञेय ठरेल. तसेच त्यानंतरच्या तथापि निलंबन कालावधी नियमित होईपर्यंतच्या

कालावधीतील वेतनवाढी त्याला उपरोक्त नियम क्र.९ व १० मधील तरतुदीनूसार अनुज्ञेय ठरतील. तसेच त्याचा निलंबन कालावधी भविष्यात ज्याप्रकारे नियमित होईल त्यानुसार प्रकरणपरत्वे संबंधित कर्मचाऱ्यास सुधारित दराने वेतनवाढ/वेतनवाढी अनुज्ञेय ठरतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९०८१६२२२४२००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Devidasrao Londhe

Digitally signed by Shrikant Devidasrao Londhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9d297f5b1e7f2bf7e6f49cd44c8fa4445bb6dd845973cab6e8165c47a8f46a4, serialNumber=5973cbc31c4186d97edeae58395e03da221147d1afdd343ba4d7a2492e6a54b6, cn=Shrikant Devidasrao Londhe
Date: 2016.09.08 16:27:45 +05'30'

(श्री.दे.लोंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सर्व मंत्रालयीन विभाग,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय
७. सचिव, मा.सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
८. सचिव, मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
९. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
१०. *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
११. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१३. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१४. *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१५. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
१६. आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२

१८. सर्व विभागीय आयुक्त,

१९. सर्व जिल्हाधिकारी,

२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२१. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,

२२. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,

२३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,

२४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,

२५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,

२६. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,

२७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२९. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,

३०. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.

३१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

३२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

३३. लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे/ औरंगाबाद

३४. संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,

३५. *विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,

३६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.

३७. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १

३८. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०

३९. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४

४०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३

४१. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५

४२. नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१

४३. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८

४४. वित्त विभागातील सर्व कार्यासने,

४५. निवड नस्ती, कार्यासन सेवा-३.

*पत्राद्वारे.